# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

## संलग्नित

आदर्श शिक्षण संस्था बीडचे

## कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

## शिरुर (का.) ता. शिरुर (का.) जि. बीड

# आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग

## वार्षिक अहवाल शै. वर्षे 2015-16

O/C

समन्वयक

प्राचार्य

25-4-2016

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | पान नं. |
|---|---|---|
| 1) | महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रम | |
| 2) | समाज स्तरावरील कार्यक्रम | |
| 3) | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर | |
| 4) | छायाचित्रे | |
| 5) | वृत्तपत्रे बातमी | |


Scanned by CamScanner

महाविद्यालय स्तर

१) दि. २६ जुलै २०१५ रोजी महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. संजय तुपे हे होते. यावेळी प्रा. विठ्ठल गुंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते बोलतांना म्हणाले की, सामाजिक समता येण्यासाठी महाराजांनी विविध जातीसमुहाच्या होस्टेल सुरू करून समता अनन्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले तर आभार प्रा. पवार बी.टी यांनी मानले.

२) २३ ऑगष्ट २०१५ रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी उच्च शिक्षण व आजचे वास्तव या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने मॅडम या होत्या. तर प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. अशोक घोळवे होते. विचार पिठावर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. संजय तुपे होते. डॉ. अशोक घोळवे बोलतांना म्हणाले की, आजच्या तरूणांनी उच्च शिक्षणाची ध्येय पार करत या ज्ञानाचा उपयोग आपल्या शेतीसाठी करावा तसेच आधुनिक पध्दतीने पाणी व्यवस्थापन, तसेच पीक व्यवस्थापन करून उत्पन्न वाढवावे. आणि देशाच्या विकासात हातभार लावावा.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. विठ्ठल जाधव, सुत्रसंचलन प्रा. नवनाथ पवळे यांनी केले तर आभार प्रा. राजाभाऊ कोरडे यांनी मानले.

३ दि. ०८ सप्टेंबर २०१५ रोजी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ८ सप्टेबर २०१६ रोजी आंतराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्तच्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने या अध्यक्ष होत्या विचार पिठावर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. व्ही.एस. जायभाये, समिर पठाण, उपप्राचार्य डॉ. संजय तुपे, विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल जाधव उपस्थित होते. या प्रसंगी साक्षरता या विषयावरील भिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच साक्षरता रॅली शिरुर परीसरातून काढण्यात आली.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. रमेश लाहोटी यांनी केले तर आभार प्रा. नवनाथ पवळे यांनी मानले.

४ दि. ०५ सप्टेंबर २०१५ या दिवशी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने या होत्या तर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. पंडीत मुळे हे होते. या प्रसंगी विचार पिठावर प्रा. व्ही.एस.जाधव उपस्थित होते. पुढे बोलतांना डॉ. पंडित मुळे म्हणाले की, शिक्षकांनी मुलांना ज्ञान देतांनाच स्वत:च्या पायावर उभे करण्याचे कार्य करावे तरच देशातील युवक आधार स्तंभ म्हणून गणला जाईल. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विठ्ठल गुंडे यांनी केले तर आभार प्रा. बी.टी. पवार यांनी मानले.



Scanned by CamScanner

6 दि. ०५/१०/२०१५ रोजी महाविद्यालयाच्या विस्तार विभागाच्या वतीने काव्य वाचन स्पर्धा घेण्यात आली यात सारिका पानसंबळ, सचिन पालवे, अश्विनी पुरी, या पुरस्कार प्राप्त विद्यर्थ्या बरोबर २४ मुलांनी स्पर्धेत सहभाग घेतला. यात प्रथम- अश्विनी पुरी, द्वितीय पालवे सचिन, तृतीय सारिका पाणसंबळ या विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली.

या कार्यक्रमाचे परिक्षक म्हणून डॉ. सुधीर येवले समाजशास्त्र विभाग प्रमुख मराठी विभाग प्रमुख नवनाथ पवळे हे होते.

7 दि. २८/११/२०१५ रोजी महाविद्यालयात क्रांतीसुर्य ज्येतीराव फुले स्मृती दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. पी.बी. देशमाने यांनी प्रतिमेस आभिवादन केले. या प्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने म्हणाल्या की, स्त्रीयांना जे स्वातंत्र आहे ते फक्त फुले दापत्यामुळे आहे असे प्रतिपादन विचार पिठावरून केले. तसेच आम्हाला जो पुरूषा बरोबरीचा पगाराचा हक्क आज या शिक्षणामुळे मिळाल्याचा पुनरूच्चार त्यांनी केला. हा कार्यक्रम विस्तार विभाग व महिला कक्षाच्या वतीने घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. शामा लोमटे यांनी केले तर आभार प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले.

8 दि. ०७ डिसेंबर २०१६ रोजी महाविद्यालयाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरीनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पी.बी. देशमाने या होत्या तर कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. उध्दव चौधर (रसायनशास्त्र विभाग) हे होते. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, OBC ला ३४० व्या कलमाद्वारे आरक्षण देऊन या वर्गास मोठा आधार दिला आहे. इतर मागासवर्गीय आरक्षणासाठी डॉ. आंबेडकरांनी सर्व मंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे OBC समुहाने संविधानातील मुलभूत हक्कांची जनजागृती करून त्या समुहाला जागृत केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. बी.टी. पवार यांनी केले तर आभार प्रा. राज कोरडे यांनी मानले. या प्रसंगी डॉ. आडगावकर, प्रा. येवले ज्ञानेश्वर, प्रा. येडे जी.एन., इतर सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

9) दि. ०७/१२/२०१६ रोजी महाविद्यालयात SBI बँकेकडून मोबाईल बँकिंग प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल जाधव (लोकप्रशासन विभाग प्रमुख) हे होते तर प्रमुख प्रशिक्षक मा. सचिन इंगळे, मा. केतन बर्वे (सहा. मॅनेजर SBI, शिरुर का.) हे होते. या प्रसंगी बोलतांना मा. सचिन इंगळे म्हणाले की, या SBI Buddy APP हे ग्राहकासाठी अत्यंत महत्वपुर्ण आहे SBI बँकेने ग्राहकाच्या सोयीसाठी विकसीत केले आहे. या द्वारे कॅश पेमेंन्ट करता येईल. त्याच बरोबर आपण घरी बसून या सर्व बँक सुविधा इंटरनेट द्वारे करू शकता. या प्रसंगी सुत्रसंचलन प्रा. चौधर उध्दव, तर आभार प्रा. जाधव व्ही.एस. यांनी मानले.

Scanned by CamScanner

10 दि. ३१/०२/२०१६ रोजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात डॉ. अनंद वाघ यांचे व्यक्तीमत्व विकास विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या प्रसंगी बोलतांना डॉ. आनंद वाघ म्हणाले की, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा शोध घेऊन त्या कलागुणांचा विस्तार करणे हाच या विभागाचा प्रमुख उद्देश आहे. व्यक्तीमत्व विकसीत होण्यासाठी प्रत्येक क्षणाचे व वेळेचे योग्य नियोजन केले तरच तुमचे व्यक्तीमत्व विकसित होईल. अपयश पचविणे हा सुध्दा व्यक्तीमत्वाचा महत्वाचा भाग आहे. मिळालेल्या ज्ञानांचा उपयोग व्यवहारीक जिवनात केला तरच त्या ज्ञानाचा उद्देश सफल होईल. विद्यार्थ्यांनी स्वावलंबी बनावे स्वावलंबनाशिवाय व्यक्तीमत्व विकसित होत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांनी नेहमी तेजेस्वी, तपस्वी आणि तत्पर्यता या तीन बाबी आपल्या जीवनात शिकल्या पाहिजेत. तरच विद्यार्थ्यांचे जीवन सफल होईल. असा सल्लाही शेवटी विद्यार्थ्यांना दिला.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी नेहमी प्रयत्नशिल असले पाहिजे. प्रयत्न केल्याशिवाय यश मिळत नाही. यश मिळविण्यासाठी सर्व चांगल्या व्यक्तींची संगत, चांगला आहार, चांगले विचार आत्मसात करण्याची गरज आहे. यासाठी आपल्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमातून आपले व्यक्तीमत्व घडवून जीवनात यशस्वी व्हावे असा सल्लाही शेवटी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन लोकप्रशासन विभाग प्रमुख तथा कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. अशोक घोळवे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

आकाशवाणी कार्यक्रम :

11 दि. ०४/०४/२०१६ ते ०७/०४/२०१६ महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण, विस्तार विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोक जागर या कार्यक्रमाचे आकाशवाणीवर सादरीकरण केले. त्यात काव्यवाचन, प्रासंगिक मनोगत व्यक्त केले. त्यात व्यासनाधिनता स्त्रीभृण हत्या, सैनिकांचे योगदान, इ. विषयावर सादरीकरण झ ाले.

Scanned by CamScanner

## समाजस्तरावरील कार्यक्रम

**१) साक्षरता रॅली :**

दि. ०८ सप्टेंबर २०१५ सकाळी महाविद्यालयाच्या प्रागंणातून ०९:०० वा. साक्षरता रॅली सुरू झाली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना साक्षरते विषयी घोषवाक्य, लावलेले फलक घोषणा देऊन या रॅलीला सुरूवात झाली. महाविद्यालयातील विस्तार विभाग स्वयंसेवक तरूण या रॅलीत सहभागी झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने यांनी रॅलीला सुरूवात करूण दिली. त्याच बरोबर सर्व शहरातून, गांधी चौक, बाजार तळ, मुख्य बस्थानक चौक, तसेच पोलीस स्टेशन चौक या मार्गाने रॅलीचे महाविद्यालयात विसर्जन झाले. यात जनजागृती विषयक गाणे, घोषणा देण्यात आल्या. या रॅलीला महाविद्यालयातील सर्व विभागातील प्राध्यापकांनी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**२) संविधान दिन :-**

दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी शिरूर शहरात बसलेल्या मसनजोगी समाजाच्या वस्तीवर संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने, तसेच समाजिक कार्यकर्ते साईराम गॅस एजन्सीचे संचालक राम कांबळे तर प्रमुख उपस्थिती उपप्राचार्य डॉ. एस.के.तुपे, गोकूळ पवार, (तालूका प्रतिनिधी पुण्यनगरी शिरुर का.) हे होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ.पी.बी.देशमाने प्रमुख सामाजिक कार्यकर्ते राम कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे दिलेल्या मतदानाच्या हक्काची जाणीव आज मसनजोगी समाजाला झालेली आहे. म्हणूनच प्रस्तावित पक्षाला नाकारून अपक्ष उपेद्वाराला शिरुरच्या नगपरिषेदेत निवडून आणला. ही जाणीव झाली आहे. असे ते म्हणाले.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. एस.के.तुपे यांचेही मनोगत संपन्न झाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. चेतना डोंगळीकर यांनी केले तर प्रस्ताविक विठ्ठल जाधव यांनी केले अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी नेहमी प्रयत्नशिल असले पाहिजे. प्रयत्न केल्याशिवाय यश मिळत नाही. यश मिळविण्यासाठी सर्व चांगल्या व्यक्तींची संगत, चांगला आहार, चांगले विचार आत्मसात करण्याची गरज आहे. यासाठी आपल्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमातून आपले व्यक्तीमत्व घडवून जीवनात यशस्वी बनावे असा सल्लाही शेवटी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ. अशोक घोळवे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थित होते..तर आभार डॉ. अशोक घोळवे यांनी मानले.

Scanned by CamScanner

14 लोकप्रबोधन रॅली पाडळी :

दि. ०९ जानेवारी २०१६ रोजी पाडळी या गावी लोकप्रबोधन रॅली संपन्न झाली.या प्रसंगी पाडळी गावातील माध्यमिक शाळेपासून रॅलीस सुरूवात झाली. मुख्य चौक, गावातील महत्वाचे चौक अशा प्रकारे मुख्य ठिकाणी थांबवून विद्यार्थ्यांनी घोषणा देवून पाडळी गाव जागृत केले. त्याच बरोबर घोषणा, घोषवाक्य लिहीलेले फलक उद. देश जगवा, झाडे लावा, साक्षरता, पर्यावरण, हुंडा, स्त्रीभ्रूण हत्या विषयक फलक विद्यार्थ्यांनी हातात घेऊन घोषणा देऊन सर्व गाव दनानून सोडले.

या प्रसंगी डॉ. शामा लोमटे, डॉ. घोळवे अशोक, प्रा. लाहोटी रमेश, प्रा. पवळे नवनाथ इ.सर्व विभागातील प्राध्यापक हजर होते. अशा प्रकारे समाज स्तरावरील रॅलीने सर्व गाव जागृत करण्यात आले.

15 **३) क्रिडा प्रबोधन रॅली : शिरुर**

महाविद्यालयाच्या वतीने विद्यापीठ स्तरावर कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी अजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या वतीने क्रिडा प्रबोधन रॅली काढण्यात आली. या परीसरात क्रिडा प्रकाराचे प्रदर्शन व्हावे तसेच परिसरातील मुलांना क्रिडा प्रकाराची आवड लागावी त्यासाठी सर्व विस्तार विभागाचे स्वयंसेवक व आलेले सर्व जिल्हयातील खेळाडू त्यांच्या बरोबरीने रॅलीची सुरूवात झाली. यामुळे सर्व शिरूर शहर घोषणेणे दनानून गेले.

आशा प्रकारे क्रिडा प्रबोधन रॅली संपन्न झाली. या सर्व कार्यास विभागातील प्राध्यापकांनी सहकार्य करावे.

रक्तदान शिबीर :

16 दि. ०६/१२/२०१६ रोजी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिरुर परीसरासाठी संस्थेचे सचिव यांच्या वाढदिवसाच्या निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उदघाटन माजी नगरसेवक मुंबई ॲड. जब्बार खाँन पठाण, शिरुर येथील तहसीलदार सानप साहेब, माजी सभापती सतिष काटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी नगरसेवक सुनिल पाटील, रमेश कातखडे, युवराज सोनवणे, इ. शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती हजर होते. या शिबीरात एकूण १०४ कार्यकर्त्यांनी रक्तदान केले.

या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागाच्या प्राध्यापकांनी सहकार्य केले.

Scanned by CamScanner

# विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर

दि. २८,२९ जाने २०१६ रोजी महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यात विद्यार्थी समुपदेशन, कौशल्य विकास व व्यवसाय मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, भारतीय उद्योग व रोजगाराच्या संधी, लैंगिक शिक्षण काळाची गरज-भ्रम आणि वास्तव इ. विषयावर शिबीरात व्याख्याने घेण्यात आली. या शिबीराची सूरूवात डॉ. उत्तम साळवे यांच्या उदघाटन व प्रमुख मार्गदर्शनाने झाली.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने या होत्या. त्याच बरोबर विचार पिठावर प्रमुख मार्गदर्शक तथा उदघाटक डॉ. उत्तम साळवे तसेच उपप्राचार्य डॉ. संजय तुपे, कार्यक्रमाधिकारी प्रा. विठ्ठल जाधव हे होते. डॉ. साळवे आपल्या मार्गदर्शनात सांगतांना म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात मिळालेले ज्ञान व अनुभव याचा तरूणांनी शिदोरी समजून त्याचा उपयोग समाज हिताच्या कार्यासाठी करून आपल्या व्यक्तीमत्वाची छाप समाजातील अशिक्षीत तरूणांना प्रेरणा देणारी बनवावी. असा सल्लाही शेवटी शिबीरातील विद्यार्थ्यांना दिला.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासासाठी महाविद्यालय स्तरावर विविध योजना विद्यापीठ, शासन रावबते. त्यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडवले जाते. आज कला शाखेकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला ही चिंतेची बाब आहे. कला शाखा जगायचे शिकवते तर वाणिज्य व विज्ञान शाखा या कसे जगायचे याचा वस्तूपाठ देते. स्वत:साठी वेळ काढा, संवाद करा, वाचन करा, ग्रंथासारखे दुसरे गूरू असणार नाहीत असेही त्या शेवटी म्हणाल्या. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आजीवन शिक्षण व विस्तार विभाग व लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले तर सुत्रसंचलन स्वयंसेवक कु. अश्विनी पुरी हिने केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार रामसिंग गडदे या विद्यार्थ्यांने मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अशोक घोळवे, प्रा. नवनाथ पवळे, प्रा. रमेश लाहोटी प्रा. खंडू वाघमारे, सर्व विभागातील प्राध्यापकांची मदत झाली. या कार्यक्रमाला मोठया प्रमाणात विद्यार्थी हजर होते.

दुपारच्या सत्रात प्रा. राज कोरडे (इंग्रजी विभाग प्रमुख) यांनी स्पर्धा परीक्षा विषयक विशेष करून M.P.S.C. व U.P.S.C. या स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी, वेळेचे नियोजन, पुस्तक यादी, दिनक्रम कसा असावा, नोट्स कशा तयार कराव्यात अशा प्रकारे अनेक विषयाची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. धम्मपाल धुंबरे यांनी केले तर आभार प्रा. संपाळ संदिप यांनी मानले.

Scanned by CamScanner

१४ दि. २९/०१/२०१६ रोजी प्रथम सत्रात प्रा. विठ्ठल गुंडे यांनी भारतीय उद्योग व रोजगार संधी या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. ते पुढे बोलतांना म्हणाले की, भारतीय तरूणांनी उद्योग व रोजगार या वर भर देऊन जास्तीत जास्त तरूण कसे उद्योग निर्माण करतील आणि मोठया प्रमाणावर उद्योग निर्माण होईल असे कार्य केले पाहिजे. नौकरी, सर्व कर्मचारी त्याच बरोबर उद्योग निर्माण झाले पाहिजेत तरच सर्वांगिन भारतीय प्रगती दिसून येईल.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक घोळवे म्हणाले की, तरूणांनी सर्व क्षेत्रात हुन्नर दाखवावा तरच देशाचा विकास होईल. सुत्रसंचलन डज्ञॅ. प्रकाश घोलप यांनी केले तर आभार प्रा. निंगदाळे विजयकुमार यांनी मानले.

दि. २९/०१/२०१६ रोजी समारोप सत्रात डॉ. चेतना डोंगळीकर यांनी लैंगिंक शिक्षण काळाची गरज - भ्रम आणि वास्तव या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्या बोलतांना म्हणाल्या की, योग्य वयात लैगिंक शिक्षण दिले तर लैगिंक समस्यांना तरूण तरूणी बळी पडणार नाहीत. त्याच बरोबर नव्या मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार केल्यास त्याचा नियम आहे की, प्रमुख गोष्टी पासून किंवा ज्ञानापासून कोणत्याही मानवास दुरू ठेवले तर त्याची उत्सूकता वाढत जाते. तो त्या गोष्टीकडे अकर्षिला जातो. म्हणून योग्य वयात योग्य शिक्षण दिल्यास त्या गोष्टीची भीती भ्रम दुर होण्यास मदत होते.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. शामा लोमटे यांनी मानले तर आभार प्रा. गोवर्धन येडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या लाभार्थीवर हा सर्व महाविद्यालयीन तरूण वर्ग होता. अशा प्रकारे महाविद्यालयीन स्तरावरील कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

Scanned by CamScanner